प्रेसनोट दि.02.08.2024

कळवा पोलीस ठाणे-बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र बाळगणे

मध्यवर्ती गुन्हे शोध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे चे पोलीसांना मिळालेल्या माहिती वरून, सपोनि/जाधव, पोहवा/3238 सैय्यद व त्यांचे पथकाने, दि.31.07.2024 रोजी सायंकाळी 19.36 वा.चे सुमारास, अमित गार्डन हॉटेल, रेतीबंदर, कळवा येथे, आरोपी क्र.1)अरविंद महादेव सोनावणे, वय 24 वर्षे, रा.शिर्डी, जि.अहमदनगर 2) आशिष रमेश गायकवाड, वय 22 वर्षे, रा.शिर्डी, अहमदनगर, 3) हाशिम हारून खान, वय 23 वर्षे, रा.उत्तमनगर, सिडको, नाशिक यांना ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यात देशी बनावटीचे एक पिस्टल (अग्नीशस्त्र) व 4 जिवंत काडतूस मिळुन आले आहे. सदर प्रकाराबाबत सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपींविरूध्द गुन्हा रजि. क्रं. । 1204/2024 भारतीय हत्यार कायदा कलम 3, 25 (1-बी),(अे) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37(1), 135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपींस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/जाधव हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर